महाराणा प्रतापसिंह शिक्षण संस्था मुंबई संचलित

# आनंदीबाई रावराणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,वैभववाडी जि.सिंधुदुर्ग - ४१६८१०, महार

**२०२० या महाराष्ट्र राज्याच्या हिरक महोत्सवी वर्षानिमित्त**


इतिहास विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी विभाग आयोजित

## आंतरविद्याशाखीय ऑनलाइन राष्ट्रीय परिषद – २०२०

महाराष्ट्राच्या जडणघडणीतील ६० वर्षे- चळवळी व विकासाचे प्र

(१९६० ते २०२०)"

**शनिवार दि. ३० मे, २०२०**



**Price: 200/-**

"महाराष्ट्राच्या जडणघडणीतील ६० वर्षे- चळवळी व विकासाचे प्रवाह

(१९६० ते २०२०)"

प्राचार्य डॉ. सी. एस. काकडे

प्रा. एस. एन. पाटील

प्रा. डी. एम. सिरसट

**© 2020 by Authors**

All rights reserved. No part of this publication may be reproduced or transmitted, in any form or by any means, without prior permission of the author. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages. [The responsibility for the facts stated, conclusions reached, etc., is entirely that of the author. The publisher is not responsible for them, whatsoever.]

**ISBN–978-1-71679-154-3**

**Published by,**
**Lulu Publication**
3101 Hillsborough St,
Raleigh, NC 27607,
United States.

| | | |
|---|---|---|
| 1 | मानवी जीवन आणि विज्ञान – तंत्रज्ञान चळवळ<br>प्रा. डॉ. शिवकुमार सोनाळकर | 1 |
| 2 | "साठोत्तर महाराष्ट्राच्या जडणघडणीतील परिवर्तनवादी सामाजिक चळवळ अंधश्रद्धा निर्मूलन"<br>प्रा. डॉ. सौ. कल्पना राजीव मोहिते | 19 |
| 3 | महाराष्ट्राचा सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विकास<br>प्रा. डॉ. व्ही.जी. भास्कर | 27 |
| 4 | कृषी पर्यटनाचे व्यवस्थापन<br>डॉ. बी. डी. इंगवले | 31 |
| 5 | आधुनिक महाराष्ट्रातील झंझावती व्यक्तिमत्व- बाळासाहेब ठाकरे<br>[1]प्रा. श्री. एस. एन. पाटील ; [2]प्रा.आर.बी.पाटील | 36 |
| 6 | महिला सबलीकरण<br>[1]प्रा. डॉ . पाथरकर एस. व्ही; [2]सौ. सरिता दशरथ देशमुख | 42 |
| 7 | आधुनिक महाराष्ट्रातील महिला धोरण व आरक्षण<br>डॉ. व्ही. ए. देऊलकर | 48 |
| 8 | महिला सबलीकरण<br>डॉ. आनंद प्रभाकर बांदेकर | 52 |
| ) | संयुक्त महाराष्ट्रातील महिला परिवर्तन चळवळी<br>प्रा. डॉ. राजेंद्र आत्माराम मुंबरकर | 57 |
| 10 | व्यसनमुक्ती-एक सामाजिक चळवळ<br>प्रा.सौ.एस.एस.पाटील | 64 |
| 11 | महिला सबलीकरण<br>अॅड. मिलिंद मोहन सावंत | 71 |
| 12 | **SOCIAL MEDIA**<br>**Aparna Sharad Kedari** | 80 |

# "साठोत्तर महाराष्ट्राच्या जडणघडणीतील परिवर्तनवादी सामाजिक चळवळ अंधश्रद्धा निर्मूलन"

प्रा. डॉ. सौ. कल्पना राजीव मोहिते
प्रोफेसर इतिहास विभाग प्रमुख, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय इस्लामपूर
मो न. - 8830473099, Email - kalpanarajmohite@gmail.com

प्रस्तावना

1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची ची स्थापना झाली. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचे स्वप्न साकार झाले.[1] महाराष्ट्राच्या वर्धापन दिनाची नुकतीच एक मे 2020 ला साठ वर्षे पूर्ण झाली. महाराष्ट्राला फार मोठी ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व राजकीय परंपरा आहे. त्यामुळे भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशाला महाराष्ट्राने नेहमीच दिशा देण्याचे कार्य केले आहे. समाजाच्या विकासासाठी प्रबोधनाची चळवळ सर्वसामान्यांपासून ते देश पातळीपर्यंत नेणारे अनेक वैचारिक, कृतिशील, व्यक्तिमत्वे महाराष्ट्रात झाली. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण साहेबांनी महाराष्ट्राच्या प्रगती साठी अद्वितीय असे कार्य करून विकासाचा पाया घातला. त्यांचीच परंपरा पुढे चालू राहिली. महाराष्ट्राच्या प्रगतीचा विकासाचा आलेख वेगवेगळ्या चळवळीच्या माध्यमातून उंचावतच गेला.[2]

समाजाला पुढे नेणाऱ्या या चळवळीत क्रियाशील गतिशील राहिल्या तर या सर्व चळवळी समाज परिवर्तनाची व नवराष्ट्र निर्मितीची ऊर्जा केंद्रे असतात म्हणूनच देशाबरोबर राज्याला प्रगतीच्या दिशेने नेणाऱ्या या चळवळी विवेकी विचारानुसार चालत राहायला हव्यात. अशीच विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात संघटितरीत्या सुरू झालेली एक चळवळ म्हणजे अंधश्रद्धा निर्मूलन होय.

प्रस्तुतच्या शोधनिबंधामध्ये या चळवळी पूर्वीची भारताची, महाराष्ट्राची सामाजिक स्थिती चळवळीची पार्श्वभूमी, चळवळीची सुरुवात, वाटचाल, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची स्थापना, कार्य, फलित, सद्यस्थिती व त्यातूनच महाराष्ट्राच्या सामाजिक प्रगतीला हातभार लागून विज्ञाननिष्ठ महाराष्ट्राची उभारणी करण्यामध्ये अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीने केलेल्या कार्या चा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

स्वातंत्र्य पूर्व भारताची सामाजिक स्थिती

अंधश्रद्धा निर्मूलन चळवळी पुर्वीची भारताशी सामाजिक स्थिती पाहता एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वी भारतीय समाज चैतन्यहीन झाला होता. समाजात नैतिक मूल्यांचा रास झाला होता. परंपरावाद श्रेष्ठ होऊन बुद्धीस्वातंत्र्य नष्ट झाले होते. अनिष्ट प्रथा परंपरा रूढी कर्म कांड यांनाच खरा धर्म मानले

जात होते. मानवता व विवेकशीलता मागे पडली होती. समाज प्रगत विचारापासून दूर होता. गतीहिन झाला होता. अज्ञानरूपी अंधकारात समाज चाचपडत होता.

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी बदलाला सुरुवात झाली. पाश्चात्यांच्या आगमनाने याच काळात भारतात आधुनिकतेचे वारे वाहू लागले. प्रबोधनाची प्रक्रिया सुरू झाली. समाजसुधारणा चळवळीला प्रारंभ झाला. बुद्धिप्रामाण्यवाद स्वातंत्र्य समतेचे विचार रूजू लागले. अनिष्ट रूढी परंपरांचे निरर्थकत्व लक्षात येऊन सामाजिक धार्मिक जीवनातील घडणाऱ्या गोष्टी विवेकाने तर्क निष्ठेने तपासण्यास सुरुवात झाली. प्रचलित अनिष्ट प्रथा परंपरा वर आघात करून नवसमाज निर्मितीचे कार्य करण्यास बुद्धिवादी वर्गाने सुरुवात केली.[3]

स्वातंत्र्यपूर्व महाराष्ट्रात देखील अशीच परिस्थिती होती. सामाजिक सुधारणा चळवळीला प्रारंभ झाला. सामाजिक सुधारणा चळवळ म्हणजे लोकांच्या आचार, विचारात बदल परिवर्तन घडवून आणणे होय. हे बदल घडवून आणून समाजाचा, राष्ट्राचा विकास साधण्याचे काम वेगवेगळया चळवळींच्या माध्यमातून चालू झाले. सुरुवातीला या बदलांना समाजाने विरोध केला पण कालांतराने अनेक बदल समाजाने स्वीकारलेले दिसतात.[4]

भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्राला प्रगत पुरोगामी बनविण्यात अनेक चळवळींनी हातभार लावला आहे महाराष्ट्राच्या सर्वांगीण जडणघडणीत या चळवळींचे कार्य महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे भारतात महाराष्ट्राची वेगळी ओळख निर्माण झाली आहे साठोत्तर महाराष्ट्राच्या जडणघडणीत विज्ञान निष्ठ विवेकी समाज निर्मितीस हातभार लावणारी एक चळवळ म्हणजे अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ होय.

परिवर्तनाची सुरुवात होऊन देखील महाराष्ट्रातील समाज या काळात अनेक रूढी-परंपरांना चिकटून होता. त्यातूनच काही शिक्षित, सुशिक्षित, अशिक्षित, उच्चभ्रू लोकांच्या हातूनही कळत नकळत अंधश्रद्धांची जपणूक केली जात होती.[5] अशा समाजविघातक परंपरांना अंधश्रद्धांना आळा घालणे ही काळाची गरज होती हे समाज प्रबोधनाचे काम अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीने केले.

शेकडो वर्षांपासून समाज जीवनाला लागलेली कीड म्हणजे अंधश्रद्धा होय प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत समाजात जादूटोणा, मंत्रतंत्र ,गंडेदोरे, ताईत,भूत प्रेत, पिशाच्च,चेटूक, करणी, भानामती, जारण-मारण, वशीकरण, काळी जादू, नरबळी, अंगात येणे अशा अनेक समाजविघातक अघोरी प्रथा चालू होत्या शकुन-अपशकुन, नजर लागणे, वास्तुदोष अशा एक ना अनेक गोष्टी समाजाच्या राष्ट्राच्या प्रगतीच्या विकासाच्या मार्गातील अडथळा ठरलेल्या होत्या. हे अडथळे दूर करायचे काम संतांनी अनेक समाज सुधारकांनी अखंड आयुष्यभर केले. संत नामदेव, तुकाराम पासून ते संत गाडगेबाबां पर्यंत व महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर इत्यादी अनेक समाजसुधारकांनी समाज सुधारणेसाठी अव्याहतपणे प्रयत्न केले.

अंधश्रद्धेने ग्रासलेल्या समाजाला डोळस बनविण्यासाठी संत गाडगेबाबांनी विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून आयुष्याच्या अखेरपर्यंत कार्य केले व महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तना मध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावली. अंधश्रद्धा,, रुढी परंपरा, अज्ञान या माणसाच्या जीवनाचे शत्रु आहेत ही जाणीव गाडगेबाबांना लहानपणीच झाली होती म्हणूनच या समाजविघातक अनिष्ट परंपरा विरुद्ध बाबांनी केलेले कार्य महान आहे. समाजाच्या अध:पतनास कारणीभूत असणाऱ्या या प्रथा म्हणजे अंगात येणे, जादूटोणा, चमत्कार, पशुबळी, नरबळी, मूल होत नाही म्हणून नवस बोलणे, बकरे कापणे, मृत्यूनंतर दशक्रिया, तेरावा, अंगारे-धुपारे, पोथी, पूजाअर्चा, देव, देवाला फळे फुले अर्पण करणे इत्यादी गोष्टी विरुद्ध बाबांनी कीर्तनाद्वारे सोप्या भाषेत समाज परिवर्तन केले.[6] देवाच्या नावाखाली होणारी शेकडो गावातील बकऱ्या, कोंबड्या, रेड्यांची हत्या बाबांनी बंद पडलेली आहे. समाज मनाच्या सद्सद्विवेक बुद्धीला हात घालून गाडगेबाबांनी लोकांचे मतपरिवर्तन केले. जादूटोणा व मुठमारी विरोधात आपल्या विनोदी शैलीत लोकांना पटवून देताना बाबा म्हणतात "जादुटोणे अथवा मुठमारून हवा त्याचा धुव्वा माणसाला उडवता येतो तर याला देवा पेक्षाही मोठा म्हणला पाहिजे, लढायात असले आठ-दहा मुठ मारणारे सोडले का काम भागले. कशाला हव्यात त्या बंदुका, तोफा नी ते आटम बांब, मंत्रेच वैरी मरे| तरी का बांधावी कट्यारे|.[7] अशा असंख्य उदाहरणांद्वारे गाडगेबाबांनी प्रचलित अंधश्रद्धांवर आघात करून समाजपरिवर्तनाचे क्रांतिकारक कार्य केले प्रबोधनातून परिवर्तनाची ची बैठक तयार होत होती.

स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रात समाजसुधारणेचे कार्य करणाऱ्या काही संघटना होत्या. वाईचे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी पुणे येथे बुद्धिप्रामाण्यवादी मंचची स्थापना केली होती लिखाण व प्रबोधनाच्या माध्यमातून त्यांचे कार्य चालू होते. 1983 मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित केलेल्या ज्ञानविस्तार व्याख्यान माले मध्ये व्याख्याते म्हणून बोलताना ते म्हणतात "आपल्याकडे अजून म्हणावी तशी वैज्ञानिक दृष्टी निर्माण झालेली नाही. त्या मुळे शिकलेले व न शिकलेले सर्व या रूढी परंपरा अंधश्रद्धा यांच्या सनातन जाळ्यात अडकलेले आहेत.देव-देवता, साधू बुवा यांचे स्तोम वाढत चाललेले आहे म्हणून खरे ज्ञान काय आहे, खरी साधना काय आहे यापासून आपण वंचित आहोत".[8] वरील विचार पाहता स्वातंत्र्योत्तर भारताच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात चळवळीची असलेली आवश्यकता लक्षात येते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींनी वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या प्रचार व प्रसारासाठी समाज प्रबोधन केलेले पहायला मिळते.

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती

साठोत्तर महाराष्ट्रात अंधश्रद्धा विरोधात व्यापक संघटित चळवळ सुरू करून समाज परिवर्तन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करणारी संघटना म्हणजे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती होय.भोळ्याभाबड्या लोकांना अनेक गोष्टींच्या माध्यमातून फसवून बुवा, बाबा, भगत, देवऋषी, मांत्रिक इत्यादी ढोंगी लोकांचा पर्दाफाश करून सर्वसामान्यांना परिवर्तनाची दिशा देणारी ही चळवळ होय. 9 ऑगस्ट 1989 रोजी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची स्थापना सातारा या ठिकाणी डॉ.नरेंद्र

दाभोलकर यांनी केली. डॉ.दाभोलकर महाराष्ट्रातील एक बुद्धिवादी पुरोगामी विचारांचे कार्यकर्ते, अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यात त्यांनी अखंड आयुष्यभर लढा दिला .त्यांनी सुरू केलेल्या या चळवळीने महाराष्ट्रातील समाजात प्रबोधन, परिवर्तन करण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. या चळवळीने समाजात प्रचलित असणाऱ्या अनेक अनिष्ट,अमानवी, माणुसकीला काळीमा फासणाऱ्या प्रथांच्या उच्चाटनासाठी अखंड लढा दिला.[9]

डॉ. दाभोलकरांना अंनिसच्या कार्यात झोकून देण्याची प्रेरणा महाराष्ट्रात राष्ट्रसेवा दलाने केरळ येथील बी प्रेमानंद यांच्या आयोजित केलेल्या दौऱ्याने मिळाली .प्रेमानंदांची चमत्कार सादरीकरणाची यात्रा महाराष्ट्राच्या बावीस-तेवीस जिल्ह्यात फिरवली गेली. यात डॉ.दाभोलकर सहभागी झाले होते. पुढे श्याम मानव डॉ.दाभोलकर यांनी एकत्रितपणे 1987 पर्यंत अंनिसचे कार्य एकत्रित केले .एकापाठोपाठ एक नागपूर, वाई ,लोणावळा इत्यादी ठिकाणी अंनिस संबंधी शिबिरे झाली. पुढे दोघात वैचारिक मतभेद झाल्यानंतर वाटा वेगळ्या झाल्या व 1989 ला डॉ. दाभोलकरांनी हे कार्य पुढे नेण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची स्थापना केली. डॉ. दाभोळकर डॉ.आ.ह.साळुंखे प्रा.प.रा.आर्डे इत्यादी अनेक कार्यकर्त्यांनी महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्याची सुरुवात केली .महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यात अनेक क्रियाशील कार्यकर्ते हे तयार होऊ लागले व  या कार्यात सक्रिय सहभाग घेऊ लागले.[10]

समितीच्या कार्यास विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात संघटनात्मक रित्या सुरुवात झाली हे कार्य करत असताना डॉक्टर दाभोलकरांनी अंधश्रद्धा निर्मूलन कार्याची एक चतुसूत्री निश्चित केली होती ती म्हणजे:

1. शोषण करणाऱ्या फसवणूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या अंधश्रद्धांच्या विरोधात प्रबोधन व संघर्ष करणे
2. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार-प्रसार करणे
3. धर्माची विधायक चिकित्सा करणे
4. इतर व्यापक चळवळींशी जोडून घेणे.[11]

वरील चतुसूत्री च्या आधारे अंधश्रद्धा निर्मूलनाचा विचार लोकात रुजविण्याचा प्रयत्न अखंडपणे चालू आहे. सुरुवातीपासूनच कार्याची व्यापक मोहीम आखली 1991 साली सातारा या ठिकाणी शिक्षण क्षेत्र व अंधश्रद्धा निर्मूलन याविषयाची परिषद झाली. सातारा येथेच अंधश्रद्धेच्या बेड्या तोडा अभियान या विषयावरील पहिली परिषद 1996 व दुसरी 1997 ला झाली. 1999 ला सोलापूरला स्त्रिया आणि अंधश्रद्धा निर्मूलन याविषयी बैठक झाली. कार्यकर्ते स्वयंप्रेरणेने यात सहभागी होत होते.परिषदातील प्रबोधना बरोबरच डॉ.दाभोलकरांची या कार्यासंबंधी पाच पुस्तके प्रकाशित झाली. विविध वैचारिक लेख,

वार्ता पत्रे, कृती कार्यक्रमाच्या माध्यमातून अंनिस चे कार्य चालू होते जेथे जेथे अंधश्रद्धेचा घटना घडल्या तेथे तेथे कार्यकर्त्यांनी संघटितपणे जाऊन अहिंसक मार्गाने उत्तर देण्याचा प्रयत्न केला.

चळवळीचे मुख्य कार्य अंधश्रद्धा निर्मूलन हे होते. समिती देव व धर्म याबाबतीतील लोकभावनांचा नेहमीच आदर करते पण देवाच्या धर्माच्या नावाने फसवणूक शोषण करणाऱ्यांना समितीचा विरोध आहे. विधायक श्रद्धांचा ही समिती आदर करते.[12] श्रद्धा व अंधश्रद्धा याबाबतीतील फरक म्हणजे एखाद्या गोष्टीवर आपला विश्वास असणे म्हणजे श्रद्धा, पण जेव्हा विज्ञानाचे नियम डावलून आपण भावनेची गुंतवणूक करतो तेव्हा अंधश्रद्धा निर्माण होते.[13] म्हणजेच कोणतीही घटना वैज्ञानिक दृष्टीकोनाने तपासणे म्हणजेच कार्यकारण संबंधाच्या आधारे तपासलेली गोष्ट माणसाच्या प्रगतीला नेहमीच उपकारक ठरलेली आहे. श्रद्धा असाव्यात पण त्या विज्ञानाच्या चौकटीत बसतात की नाही हे तपासून पहाव्यात. अगतिकते पोटी, खोट्या आशेपाई, अज्ञानापोटी अंधश्रद्धा जन्म घेते अशा अंधश्रद्धेपोटी घडणाऱ्या हजारो गोष्टींचा पर्दाफाश करण्याचे काम अंनिस ने महाराष्ट्राच्या अनेक गावातून केले आहे व ते आजही चालू आहे.

1989 ते 2019 मअंनिसच्या स्थापनेस तीस वर्ष झाली. कार्यकर्त्यांनी आपल्या जीवाची बाजी लावत मेहनतीने ही पुरोगामी चळवळ चालू ठेवली त्यामुळे भानामती डाकीण या सारख्या भयानक अनिष्ट प्रथांचे खरे स्वरूप पुढे येऊन या प्रथांच्या विरोधात महाराष्ट्रातल्या स्त्रियांना कायद्याचं संरक्षण मिळाले आहे. नंदुरबार जिल्ह्यात डाकीण प्रथा, मराठवाड्यात भानामती प्रकार विशेषता स्त्रियांना त्यात लक्ष्य केले जाई. या विरोधात आज पर्यंत धडक मोहीम आखुन तेराशे पेक्षा जास्त भानामतीची प्रकरणे अंनिस ने हाताळून उध्वस्त होणारी कुटुंबे सावरली.[14]

जात पंचायत - यासारख्या बेकायदेशीर अमानवी प्रथा त्यापासून होणारे समाजाचे शोषण थांबवण्याचे काम समितीने केले. या प्रथेला विरोध करणारा कायदा अनेक प्रयत्नानंतर लढे देऊन 13 एप्रिल 2016 रोजी महाराष्ट्र सामाजिक बहिष्कारा पासून व्यक्तिचे संरक्षण (प्रतिबंध बंदी व निवारण) 2016 हे विधेयक एकमताने मंजूर झाले. शोषण करणाऱ्या अनेक जात पंचायती बरखास्त झाल्या. जातपंचायतीच्या जाचातून अनेकांची सुटका झाली याशिवाय अनेक प्रकरणे हाताळून जटा निर्मूलन, देवदासी, अंगात येणे, भूतबाधा, चेटूक, मुट मारणे, नव, चमत्कार भानामती, बुवा, बाबा, माता यांचे अघोरी अत्याचार व समाजाचे शोषण करणाऱ्या अशा अनेक बुवा बाबांची भांडाफोड अंनिसने केली.[15] चमत्कार करण्याचा दावा करणाऱ्या अशा बुवा बाजींची समाजाला लागलेली कीड दूर करून अनिस ने बुवाबाजीला आळा घातला.

चमत्काराचे - प्रशिक्षित कार्यकर्त्यांनी शाळा महाविद्यालयांमधून हजारो प्रयोग करून भानामती काढणे, भूत काढणे, करणी, पेटत्या निखाऱ्यावर चालणे इत्यादी अनेक चमत्कारांच्या पाठीमागे असणारे विज्ञान सांगण्याचा प्रयत्न केला आहे चालू आहे.

विवेक वाहिनी - अनेक महाविद्यालयात विवेक वाहिनी स्थापन करून वैज्ञानिक जाणीवा विकसित करण्याचा प्रयत्न अंनिस ने केला.

विज्ञान बोध वाहिनी मार्फत शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ग्रहतार्‍यांची शास्त्रीय माहिती , विविध खगोलीय अविष्कार यांची माहिती फिरत्या नभांगण द्वारे देण्याचे काम 2003 पासून सुरू आहे. फलज्योतिष ऐवजी खगोलशास्त्रावर सर्वसामान्यांचा विश्वास बसण्यासाठी लोकांना फलज्योतिषाशी निगडीत पंचांग, ग्रह, नक्षत्र, रास, मंगळ दोष, कडक मंगळ, कुंडली, ग्रह दशा, दहावा गुरु, शनि साडेसाती इत्यादी गोष्टी सोप्या करून सांगण्याचे व ज्योतिषाच्या कचाट्यातून लोकांची सुटका करण्याचा प्रयत्न हा या मागचा हेतू.[16]

वैज्ञानिक जाणीवा प्रकल्पांची 1992 पासून अंनिस ने सुरुवात केली वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे सद्सद्विवेक बुद्धीने एखाद्या गोष्टीचा केलेला स्वीकार होय. समाज विज्ञानाचा वापर करतो पण वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारत नाही. मिळवलेल्या ज्ञानाची चिकित्सा न करता ते ज्ञान स्वीकारतो. वैज्ञानिक दृष्टिकोनातूनच अंनिस ने अनेक चमत्कारांना आव्हान दिलेले आहे.

वैज्ञानिक दृष्टिकोन समाजात नव्हता म्हणून 1976 मध्ये इंदिराजी गांधींनी घटनेमध्ये दुरुस्ती केली. भारतीय संविधानाने नागरिकांना फक्त हक्क दिले होते पण त्यात आता या दुरुस्तीने कर्तव्यांचा समावेश केला.त्यातील एक कर्तव्य म्हणजे विभाग 4-3 कलम 51 अ नुसार नागरिकांच्या कर्तव्यांचा समावेश केला व त्यानुसार भारतीय नागरिक वैज्ञानिक दृष्टिकोण, शोधक बुद्धी, आणि मानवतावाद यांचा अंगीकार व प्रसार करेल. वैज्ञानिक जाणीवा प्रकल्प राबवला जातो.[17]

वास्तुशास्त्र हे देखील सद्यस्थितीत गंभीररित्या अवलंबिले जाणारे व इतर तंत्रविद्या प्रमाणेच समाजाचे शोषणाचे हत्यार आहे ही अंनिस ने उदाहरणा दाखल दाखवून दिले आहे.[18]

स्त्रिया व अंधश्रद्धा निर्मूलन हा चळवळीचा जवळचा विषय त्याबाबत या घटकावर विशेष लक्ष दिले आहे. महिला, युवती यांच्यामध्ये अनेक उपक्रमातून अंधश्रद्धा बाबत जाणीव जागृती केली जाते. जुलै 2012 मध्ये समितीने महिला जाहीरनामा तयार केला आहे महिला सबलीकरण प्रबोधन अभियान सुरु केले आहे.[19]

अशा रीतीने अंधश्रद्धा निर्मूलनाच्या या कार्याबरोबरच अनेक पर्यावरण प्रकल्प देखील अंनिस ने राबवलेले आहेत, विसर्जित गणेश मूर्ती दान, निर्माल्य संकलन, फटाकेमुक्त दिवाळी, सापा बाबत प्रबोधन, होळी लहान पोळी दान इत्यादी अनेक उपक्रमाद्वारे पर्यावरणाचा मानवाकडून होणारा ऱ्हास थांबवण्याचा प्रयत्न चालू आहे.

कायदा व चळवळीचे यश

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सुरु झालेली ही व्यापक संघटित अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ एकविसाव्या शतकात विस्तारली. महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यातून 400 पेक्षा जास्त शाखा मधून हजारो

दान दिलेले आहे. या चळवळीचे यश म्हणजे अंधश्रधांचे निर्मूलन त्याचबरोबर समाजातीत
ानाचा फायदा घेऊन विघातक वृत्ती कडून होणारे शोषण थांबवण्यासाठी महाराष्ट्र सरकारने "महारा
ळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा जादूटोणा प्रतिबंध कायदा 2013" असा कायद
त्वात आला.[20] असा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. या कायद्या
तीच्या अखंड कार्याला यश मिळाले पण हे यश पहायला डॉ.दाभोलकर हयात नव्हते. 20 ऑगस्ट
13 रोजी त्यांची हत्या झाली पण त्यांचे कार्य व विचार चिरंतन राहतील.

ारोप

साठोत्तर महाराष्ट्राच्या जडणघडणीत अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे श्रद्धांचे निर्मूलन, चमत्कारांना आव्हान, बुवाबाजीचा भांडाफोड, इथपासून सुरु झालेला हा चळवळीच स विवेकवाद, वैज्ञानिक दृष्टिकोन, धर्मचिकित्सा इथपर्यंत पोहोचला. ही चळवळ महाराष्ट्र अंधश्रद्ध र्मूल ) समितीच्या स्थापनेने मोठ्या प्रमाणात सुरु होऊन विस्तारलेली आहे.परिवर्तन झाले आहे होत : पण तरीही आज अजून चळवळीची गरज आहे. सद्यस्थितीत कोरोनाच्या महामारी ने संपूण ्याला गेले पाच महिने झाले ग्रासले आहे. विज्ञानाच्या युगात ही जोपर्यंत कोरोनावर लस उपलब्ध ा नाही तोपर्यंत मानव हतबल आहे. हे वास्तव असूनही समाजात कोरोना बाबत अंधश्रद्धेतून अनेक ी केल्या जात आहेत. कोरोना घालविण्यासाठी अंगात येणे, भाकिते करणे इत्यादी अनेक प्रका ू आहेत हे जळजळीत वास्तव आहे त्यामुळे समाजाला आजही प्रबोधनाची, अंधश्रद्धा निर्मूलनाची ज आहे.

र्भ


| | |
|---|---|
| ार (डॉ) जे के | "गर्जा महाराष्ट्र आपुला", राज प्रकाशन कोल्हापूर सहा मे 2011 प्रथमावृत्ती पृ 3 |
| (सं).गायकवाड आर डी | असा घडला महाराष्ट्र भाग 1<br>प्रकाशक डॉ. सौ हेमलता गायकवाड सातारा 19 मे 2018 पृष्ठ 37 |
| वैद्य (डॉ). सुमन, कोठेकर (डॉ). शांता | आधुनिक भारताचा इतिहास 1857 ते 1920<br>साईनाथ प्रकाशन नागपूर प्रथमावृत्ती 1991 पृष्ठ 377 |
| तांबे श्रुती | पुरोगामित्व म्हणजे काय आगरकर विचार व्यासपीठ गोरेगाव मुंबई दुसरी आवृत्ती सप्टेंबर 2002 पृष्ठ वीस |
| (सं). पवार विश्वनाथ | महाराष्ट्रातील परिवर्तन चळवळ (प्र) अध्यक्ष सातारा इतिहास संशोधन मंडळ प्रथमावृत्ती 26 जून 2013 पृष्ठ 142 |